प्रेसनोट दिनांक – ०२/०९/२०१८

---

## गंभीर गुन्हयातील फरारी सराईत गुंड रिझवान ऊर्फ टिपु सत्तार पठाण जेरबंद

---

श्री संभाजी अण्णा भोसले वय–२५ रा - मयुर पार्क हांडेवाडी चौक तालुका - हवेली जिल्हा पुणे यांनी दिनांक – १९/०७/२०१७ रोजी सायंकाळी साडेसहा वाजता हांडेवाडी चौक ता - हवेली जिल्हा पुणे येथे संशयीत आरोपी १) आकाश ऊर्फ बाळा मनोहर माकर वय – २३ रा – काळेपडळ हडपसर पुणे २) साहिल इलाही शेख रा - हडपसर पुणे ३) टिपु रिझवान पठान रा - सैयदनगर हडपसर पुणे यांनी पुर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन फिर्यादी यांना लाकडी दांडक्याने बेदम मारहाण गंभीर दुखापत केली आहे त्याबाबत हडपसर पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा दाखल आहे सदर गुन्हा केल्यानंतर यातील आरोपी साहिल इलाही शेख व टिपु ऊर्फ रिझवान पठाण हे फरार झाले होते.

खडक पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी गणेशोउत्सवाचे अनुषंगाने हददीत गस्त घालत असताना पोलीस कर्मचारी गणेश माळी व अशिष चव्हाण यांना त्यांचे बातमीदाराकडुन बातमी मिळाली की टिपु ऊर्फ रिझवान पठाण हा त्याचे मित्रास भेटण्यासाठी जुन्या रामोशीगेट पोलीस चौकीजवळ येणार आहे अशी बातमी मिळाली त्यानुसार पोलीसांनी संशयीत टिपु ऊर्फ रिझवान सत्तार पठाण वय – २६ रा – गल्ली नं १६ समोर खाजा मंझिल बिल्डिंग प्लॅट नं १० सैय्यदनगर हडपसर पुणे यास पकडले आहे त्याचेकडे अधिक तपास केला असता त्याचा गुन्हयामध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे तसेच त्याचेविरुध्द वानवडी पोलीस स्टेशन पुणे याठिकाणी पिस्तोल जवळ बाळगल्याचा गुन्हा दाखल आहे व त्यागुन्हयामध्ये तो फरारी असल्याचे उघडकीस आलेले आहे. सन २०१४ सालामध्ये संजय वाल्मिक काळभोर याचे खुनाच्या गुन्हयामधील आरोपी आहे सदर गुन्हयातील आरोपीविरुध्द मोका कायदयाअंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे त्या गुन्हयामध्ये तो जामिनावर सुटलेला आहे तसेच त्यास पुणे शहर व हडपसर भागात येण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे त्या आदेशाचा त्याने भंग केलेला आहे. त्याचेविरुध्द यापुर्वी हडपसर पोलीस स्टेशन पुणे , बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे , लोणी काळभोर पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण , या पोलीस स्टेशनला गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहे त्यामध्ये खुनाचे दोन , खुनाचा प्रयत्नाचे चार , गंभीर दुखापतीचे दोन , दुखापतीचे तीन , खंडणीचा एक , जिवे मारण्याची धमकीचे दोन , सरकारी कामात अडथळा केल्याचा एक असे एकुण सोळा गुन्हे दाखल आहेत त्यास सन २०१२ मध्ये पुणे शहर व जिल्हयामधुन दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आले होते. त्यास पुढील कारवाईसाठी हडपसर पोलीस स्टेशन पुणे यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदर कारवाई परिमंडळ – १ पुणे चे पोलीस उपआयुक्त श्री बसवराज तेली, शहर विभागाचे सहायक पोलीस आयुक्त श्री. बाजीराव मोहीत यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेन्द्र मोकाशी व श्री संभाजी शिर्के पोलीस निरीक्षक (गुन्हे) व पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड व पोलीस कर्मचारी गणेश माळी, अशिष चव्हाण, विजय कांबळे, संदिप कांबळे, अनिकेत बाबर यांनी केली आहे.